## -:: प्रकरण - तीन ::-

## बलुतेदार आणि त्यांचे धंदे

# प्रकरण - तीन

## बलुतेदार आणि त्यांचे धंदे

### प्रास्तावीक :

महाराष्ट्रात सामाजिक आणि आर्थिक जीवन यांचा फार जवळचा संबंध होता. सतराव्या आणि अठराव्या शतकात खेडे हे आर्थीक व्यवहाराचे केंद्रबिंदू होते. त्यांचा आर्थिक अभ्यास करत असताना त्यांच्या चालीरीती आणि गावगाडयातील त्यांचे स्थान पहाणे गरजेचे ठरते. खेडया-मध्ये रहाणा-या लोकांचे निर्वाहाचे एकमेव साधन म्हणजे जमीन हेच होते. म्हणुन ज्याला जमीन असे तेच गावचे प्रमूख रहिवाशी समजले जात. त्यांना मिरासदार म्हणत असत.[१]

गावामधील जे वतनदार अधिकारी असत त्यांच्यामार्फत गावाचा कारभार पाहिला जात असे. म्हणून त्यांना गावामधून महत्वाचे स्थान होते. मराठा कालखंडात बलुतेदार हा एक महत्वाचा घटक होता. संपूर्ण गावाची विविध कामे बलुतेदार करीत असत आणि त्यांच्या श्रमाचा मोबदला म्हणून त्यांना सुगीच्या हंगामात वर्षाकाठी धान्य उत्पादनाचा कांही ठरावीक भाग दिला जाई. या पध्दतीलाच "बलुते" पध्दत म्हटले जाई.[२] बलुतेदारांमध्ये अनेक व्यवसायिकांचा समावेश होत असे. बलुतेदारांची सेवा ही गावाच्या दृष्टीकोनातुन महत्वाची समजली जात असे.

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

शिवकालात आणि पेशवेकालात बलुतेदार हे गावचे प्रतिष्ठीत नागरीक समजले जात असत. त्यांना गावात चालणा-या कामकाजात सहभागी होता येत असे. गावात चालणा-या जातपंचायती आणि गोतसभा यामध्ये सुध्दा बलुतेदारांना मान असे. बलुतेदाराप्रमाणे अलुतेदार हे गावातील दुय्यम प्रतीचे सेवक होते. या अलुतेदारांमध्येही अनेक व्यवसायिकांचा समावेश होत असे.[३]

बलुतेदार वर्गात प्रामुख्याने महार, मांग, चांभार, सुतार, लोहार, सोनार, कुंभार, परीट, न्हावी, कोळी, जोशी, गुरव, मुलाणा यांचा समावेश होत असे. व अलुतेदारांमध्ये तेली, तांबोळी, शिंपी, कासार, धनगर, माळी, जंगम इत्यादी जातीतील लोकांचा समावेश होत असे. या बलुतेदारांना व अलुतेदारांना मिळणारा कामाचा मोबदला हा निश्चितपणे सांगता येत नाही. कारण परंपरेने व रितीरीवाजाने त्याना मोबदला शेतकरी देत असत. कांही बलुतेदाराना सरकारातून जमीन इनाम म्हणून मिळे. महारांना मिळणा-या इनाम जमिनींना हाडकी, हडळा म्हणत असत.[४] या मोबदल्यात त्यांना गावची सेवा करावी लागे. बलुतेदारांची व अलुतेदारांची संख्या ही त्या गावाच्या आकारावर अवलंबून असे. शेतकरी सरकारी हिश्श्यांबरोबर बलुतेदारांचा हिस्साही बाजूला काढून ठेवत असत.[५]

शिवकालाप्रमाणे पेशवेकाळातही हीच पध्दत थोड्याफार फरकाने चालू होती. पाटील, कुलकर्णी हे गावचे सरकारी अधिकारी असले तरी त्यांचे जीवन शेतक-यावर अवलंबून असे. शेतक-यांच्या व वतनदारांच्या गरजा भागविणारे बलुतेदार व अलुतेदार असत. बलुतेदाराना गावामध्ये

8854
A

दोन प्रकारे कामे करावी लागत असत• एक म्हणजे त्याना गावक-यांची कांही कामे करावी लागत आणि दुसरी गोष्ट म्हणजे गावामार्फत सरकारची कामे करावी लागत• गावक-यांच्या कामाबद्दल त्यांना बलुते मिळे• तर सरकारी कामाबद्दल सारामुक्त जमीन इनाम मिळे•[६]

ग्रामीण अर्थव्यवस्थेचा विचार करता पेशवेकाळात वहातुकींची साधने अपुरी असल्याने त्याना लागणा-या सर्व गरजा या खेडयातच भागवाव्या लागत असत• त्यामुळे बलुते प्रधान ग्रामीण अर्थव्यवस्था ही संघटना, सेवा आणि मोबदला या तत्वावर आधारलेली होती• बलुतेदाराचे पद हे वंशपरंपरागत असल्याने गावकरी त्याला त्यांच्या वतनापासून वंचित करीत नसत• त्यामुळे सारा ग्राम व्यवहार सुरळीत चाले• बलुते अधीष्ठीत ग्रामव्यवस्थेमुळे गावच्या आर्थिक उद्योगांना स्वयंपूर्णता आली होती•[७]

पेशवेकाळात बलुतेदाराच्या जाती त्यांच्या व्यवसायांचा फार जवळचा संबंध होता• प्रत्येक जात विशिष्ठ प्रकारचा व्यवसाय वंशपरंपरेने करीत असे• व्यवसाय व जात एकमेकांशी अत्यंत निगडीत होते• अनेक जातीमध्ये आणि व्यावसायिकामध्ये त्यांच्या काम करण्याच्या पध्दतीवरुन पोटभाग पडले होते• एका उल्लेखावरुन बलुतेदारात श्रेष्ठ कनिष्ट दर्जा होता हे आढळते• सुतार, महार, मांग, चांभार यांचा वाटा एका वर्षाला प्रत्येकी १० रुपये होता• कुंभार, न्हावी, परीट, लोहार यांचा वाटा प्रत्येकी ५ रुपये होता व जोशी, गुरव, सोनार, मुलाणा यांचा वाटा प्रत्येकी २½ रुपये इतका होता• यावरुन बलुतेदारात तीन श्रेण्या होत्या असे आढळते• पहिल्या श्रेणीत सुतार, महार, मांग, चांभार यांचा तर दुस-या श्रेणीत कुंभार, न्हावी, परीट, लोहार यांचा समावेश होत होता•

कनिष्ठ श्रेणीत जोशी, गुरव, सोनार, मुलाणा यांचा समावेश होत होता. बलुते वतनाची श्रेष्ठ कनिष्ठ श्रेणी जातीवर किंवा स्पृश्य अस्पृश्यतेवर नव्हती. या वतनदारीच्या श्रेणीत स्थल, कालानुसार फेरफार होई.[८]

तत्कालीन समाजातील अर्थव्यवस्थेमुळे प्रत्येक जातीला दुसऱ्या जातीवर अवलंबून रहावे लागे. जातीतील व्यवसाय वंशपरंपरेने चालत असत. वंशपरंपरागत व्यवसाय सोडून दुसरा कोणताही धंदा अथवा व्यवसाय करण्याचा प्रयत्न केला गेला तर त्याच्यावर आक्षेप घेतले जात.[९]

म हा र :

पेशवेकालीन महाराष्ट्रात महार ही अस्पृश्य जातीपैकी एक होती. या जातीतील लोक गावाबाहेर रहात असत.[१०] मह + अर म्हणजे महार होय. जंगलात रहाणारा, मृतहर म्हणजे मेलेली जनावरे ओढणारा म्हणजे महार असे या नावाच्या उत्पत्ती विषयी अत्रेनी गावगाडयात माहिती दिली आहे.[११]

अस्पृश्य वतनदारात जास्त काम महाराला करावे लागे. गावचा सरकारी वसूल तालुक्यात अगर तहशिलात महारालाच पोहचवावा लागे. एखादा प्राणी मेल्यानंतर गावाबाहेर ओढून टाकणे, मृतांच्या दहनास लागणारी लाकडे महाराला न्यावी लागत. या बरोबर त्याला कांही फौजदारी कामे करावी लागत. त्यामध्ये प्रामुख्याने चोरीचा तपास लावणे, चोरांचा मार्ग काढणे, गावात आल्यागेल्यांची वर्दी पाटलाला देणे इत्यादी कामे महार जागल्या करीत असे. जागले हे रात्रंदिवस चावडीवर आळीपाळीने

पहा-यास बसत. गावाच्या रक्षणाची जबाबदारी रामोशावर असे.[१२]

महार हा गावचा पहारेकरी असला तरी गावात आब राखून असे. गावातील महारांची संख्या ही गावाच्या विस्तारावर अवलंबुन असे. महारांची इतर कामे म्हणजे गावच्या सीमांचे रक्षण करणे, गावच्या सीमेवर होणारे इतरांचे आक्रमण थोपविणे इत्यादी होती. गावच्या सीमाची खडानखडा माहिती असल्याने जमिनी संबंधीच्या खटल्यात त्याची साक्ष महत्वाची असे. गावच्या वेशीचे दरवाजे सकाळी उघडणे आणि संध्याकाळी बंद करणे हेही त्याचेच काम असे. पहारेक-यांचे काम करणा-याना वेसकर म्हणत. गावातील महारांची नावेही त्यांच्या कामानुसार वेगळी असत. उदा. जागल्या, पाडेवार, तराळ, राबता महार, लबेचा महार इत्यादी. रात्री जागरण करुन प्रवाशांचे सामान सांभाळणे, ही जागल्याची कामे असत. तर प्रवाशांच्या सामानाची वहातुक करणे हे तराळ करीत असत. सरकारी पत्राची ने-आण करणे, सरकारी निरोप्या म्हणुन काम करणे इत्यादी कामे महाराला करावी लागत. या सरकारी कामाबरोबर गावक-यांची कामे त्याला करावी लागत. लग्नाच्या वेळी सरपण आणुन टाकणे, लग्न मंडप झाडून स्वच्छ करणे इत्यादी कामाबद्दल त्याला शेला व त्याच्या पत्नीस साडी चोळी मिळे. होळीच्या दिवशी महार अग्निने होळी पेटवीत असे. महाराला मेलेल्या जनावराची प्रेते व कातडी घेण्याचा हक्क होता. त्याच्या या विविध सेवासाठी त्यास भाडेमुक्त शेत जमीन मिळे. त्यास हडकत, हडवळा महारीक, हरकी म्हणत असत.[१३]

पेशवेकाळात धान्य साठविण्यासाठी पेवांचा उपयोग केला जाई. ज्यावेळी शेतक-यालाधान्याची गरज भासे त्यावेळी शेतकरी आपले पेव काढीत

असत. तेंव्हा पेवगुड म्हणजे पेवातील खराब झालेली ज्वारी महाराना मिळे.[१४] कांही ठिकाणी महाराना प्रतिवर्षाला १० रुपये मुशाहीरा मिळत असे.[१५] जागल्या अथवा रामोशी हा पाटलाचा मदतनीस असे. गावात झालेल्या चोरीचा तपास लावण्याचे काम रामोशी करत असत. व ती त्याची जबाबदारी असे.[१६]

महारांच्या लग्नासंबंधी पेशवेकालीन कागदपत्रावरुन माहिती मिळते त्यांची वरात ही पायी निघे.[१७] पेशवाईत कांही गावामधुन महार जातीचे लोक पाटील असत.व ही पाटीलकी टिकविण्यासाठी ते कार्यरत रहात असत.[१८]

अशाप्रकारे महार हा बलुतेदार वा त्याचा व्यवसाय गावाच्या दृष्टीकोणातून उपयुक्त होता.

मांग :

मांगाची जात ही अस्पृश्य जातीतील एक होती म्हणुन महारवाडया-प्रमाणे मांगवाडे सुध्दा गावाच्या बाहेर असत.[१९] असे असले तरी मांग हा महत्वाचा बलुतेदार समजला जाई. कांही वेळा त्याच्या कामाच्या मोबदल्यात शेतकरी मांगाना दरवर्षी रुपये १० देत असत.[२०] मांग अंबाडीच्या केलीच्या तंतुपासुन शेतकऱ्यासाठी दोर बनवत असे. बैलावर घालावयाच्या जुवासाठी पक्का दोर, मांग बनवित असे. हे शेती साहीत्य करण्यासाठी मांगाना आवश्यक ती साधनसामुग्री शेतकरी पुरवित असत.[२१] तो केरसुणी पुरवीत असे.[२२] मृत जनावरे ओढण्याचे काम कांही गावातून मांग करीत असत.

सन १७७३ च्या एका पत्रात, मेलेले जनावर ओढण्याच्या कामावरुन महार व मांग यांच्यात निर्माण झालेल्या तंटयाचा उल्लेख आहे.[२३] कांही मांग चोरी करीत असत असे कांही कागदपत्रावरुन दिसून येते.[२४] मंग वाजंत्री म्हणून काम करीत असत.[२५] महाराप्रमाणे मांगसुध्दा रखवालीची कामे करत असत. सन १७७८ मध्ये सातारा शहरात रखवालीसाठी मांग व बेरड होते.[२६]

मांगास त्यांच्या कामाचा मोबदला हा कांही वेळेस धान्याच्या स्वरुपात मिळे. तर कांही वेळेस पैशाच्या स्वरुपात मिळे. बेंदुर अथवा पोळयाच्या दिवशी मांग तोरण बांधण्याचे काम करीत असत.[२८] त्याला शेतक-याकडून गु-हाळाच्यावेळी रोज ऊस आणि थोडा गूळ मिळत असे.[२९] मागांची लग्ने रानात होत असत. त्यावेळी पायी पडलेले तांदुळ पाडेवार घेत असे.[३0] मांगाची लग्नाची वरातही हत्यावर निघे. परंतु कांही गावातुन ती पायी निघे असा उल्लेख आढळतो.[३१]

महाराप्रमाणे मांग हा बलुतेदार महत्वाचा असल्याने तो शेतक-याच्या उपयोगाचा बलुतेदार समजला जाई. परंतु गावलक्ष्मीच्या वेळी महारा खालोखाल मांगानासुध्दा मान होता. सन १७३५ च्या क-हाडच्या गावलक्ष्मीच्या यात्रेचा वृत्तांत पाहील्यास मांगापेक्षा महाराना जास्त हक्क मिळाले होते असे दिसुन येते.[३२]

टी.एन्.अत्रेंच्या मते मांगामधील एक उपजात म्हणजे मांगगारुडी होय. ही जात फिरस्ती असून सापगारुडयांच्या खेळ करीत असे.[३३] त्याचबरोबर चो-याही ही जात करीत असे.

वरील सर्व माहितीवरुन पेशवेकालीन महाराष्ट्रामध्ये मांगाचा व्यवसाय आणि त्यांचे समाजातील स्थान दिसून येते.

## चांभार :

पेशवेकालीन महाराष्ट्रात चांभाराचा व्यवसाय महार, व मांग यांच्या व्यवसायाप्रमाणे महत्वाचा होता. त्यामुळे या लोकांना खेडयामधून असणारे महत्व समजून येते. चांभाराला गावातील भरणा-या गोतसभेत स्थान असे.[३४] एखाद्या गावाचा चांभार गाव सोडून गेल्यास चमडयाची कामे करुन घेण्याची अडचण निर्माण होई. त्यावेळी तेथील गावकरी अशा चांभारा विरुध्द तक्रारी करीत असत. अशाच एका उल्लेखावरुन सन १७७९ मध्ये झाल्याबा चांभार आपले पिसुर्ले गाव सोडून आबाल्यास जाऊन राहीला होता. त्यामुळे त्याच्यावर गुन्हेगारी लावली गेली होती.[३५]

कांही वेळा त्याला गावातुन मिळणारे बलुते हे प्रतिवर्षाला १० रुपये मिळे.[३६] गु-हाळाच्या हंगामात त्याला दररोज ५ रुपये ऊस व थोडा गुळ मिळे. ऊसाच्या मोळया बांधण्यासाठी लागणा-या वाख्या त्याला पुरवाव्या लागत असत.[३७]

चांभाराला मिळणारे बलुते हे किरकोळ कामासाठी असे. परंतु शेतक-याला चांभारापासुन नवीन चपलाचा जोड अथवा विहीरीवरील मोट घ्यावयाची असेल तर त्याची रोख किंमत शेतक-याला द्यावी लागे. परंतु सदर मोट फाटल्यास तिला ठिगळ लावण्याचे काम चांभार बलुत्यात करुन देई.[३८]

पेशवाईत जे व्यवसायीक आपापला व्यवसाय करीत असत त्या व्यवसायाबद्दल त्यांना सरकारात कर द्यावा लागे. चांभार सुध्दा त्याच्या व्यवसायाचा कर भरत असे. हा कर जिन्नस आणि रोख स्वरुपात भरला जाई.[३९]

गावातील वतनदार मंडळींना वर्षाला चपलाचा जोड द्यावा लागे. कांही उल्लेखावरुन चामडयाचे दोन जोड देशमुखाला आणि एक जोड देशपांडे याना द्यावे लागे.[४०] अकलुजच्या देशमुखाला तेथील चांभार वर्षाला दसरा सणाच्या वेळी दोन जोड देत असे.[४१]

कांही वेळा वादामुळे चांभार बुरुड जातीच्या लोकांच्या चपलाचे काम करीत नसत. जुन्नर येथील बुरुडाच्या चपल सांधण्याचे काम चांभार करीत नसल्याने तेथे बुरुड आणि चांभार यांच्यात वाद निर्माण झाला होता.[४२] तसेच चांभार बुरुड जातीतील लोकांच्या चपला सांधत नसल्याने ते स्वत:ला इतर अस्पृश्य जातीमध्ये श्रेष्ठ समजत असे वाटते.[४३]

पेशवेकालीन महाराष्ट्रात होळी सणाच्यावेळी होळीची पूजा केली जाई.आणि पुजेसाठी रात्रीच्या वेळी गावातुन लोकांचे नैवेद्य होळीच्या पुजेच्या वेळी येत त्यावेळी चांभाराला दिवटी धरावी लागे. त्या मोबदल्यात त्याला होळी समोरील ५ नैवेद्य मिळत असत.[४४] सन १७४८ मध्ये मौजे पारगाव ता.कन्हेपठार येथील महाराचा आणि चांभाराचा या होळीच्या नैवेद्यावरुन वाद निर्माण झाला होता.[४५]

क्रॉवफोर्डच्या मते मोची ही चांभार जातीतील हलकी जात असुन

मोची लोक कातडी कमविण्याचा व्यवसाय करणारे होते.[४६]

चाभारास त्याच्या सेवेप्रित्यर्थ गावक-याकडून त्याच्या कामास लागणारे कातडे मिळे, नवीन पादत्राणाबद्दल त्यास रोख पैसे मिळत. पाटील, कुलकर्णी इत्यादींच्या घरच्या विवाहाप्रसंगी त्यास त्यांच्या जावयास पादत्राणे भेट द्यावी लागत आणि त्याबद्दल त्यास जेवण मिळे.[४७] चांभार जातीतील कांही स्त्रिया या कुणबिणीचा व्यवसाय करत असत असा उल्लेख आढळतो.[४८]

सु ता र :

पेशवेकालीन महाराष्ट्रात सुताराचा व्यवसाय करणारे अनेक लोक होते. लाकडापासून तयार केलेली शेती अवजारे व फर्निचर करणे हे या व्यवसायाचे वैशिष्टये होते. महार, मांग, चांभाराप्रमाणे सुताराला बलुत्यात श्रेष्ठ दर्जाचा मान होता. कांही वेळा शेतक-याकडून त्याला वर्षाला १० रुपये मिळत असत.[४९] कांही वेळा तो इतर बलुतेदाराप्रमाणे शेतक-यांच्या घरी जेवण घेत नसे म्हणून त्याला शेतकरी कोरडा शिधा देत असत.[५०]

सुताराचा व्यवसाय हा प्रामुख्याने शेतक-याशी निगडीत असा होता. सुताराचे काम म्हणजे शेती अवजारे बनविणे, दुरुस्त करणे इत्यादी होते. शेतक-यासाठी सुताराने नवीन नांगर भरुन दिला तर शेतक-याकडून सुताराला धान्य मिळत असे.[५१]

एन्थोव्हेनच्या मते सुतारकीचा व्यवसाय हा कांही गावातून सुतार नसल्यामुळे महार व मांग करीत असत.[५२] सुताराला बारा बलुत्यामध्ये मानाचे स्थान होते असा उल्लेख तत्कालीन कागदपत्रावरुन दिसून येतो.[५३] गावांमधून जे जे व्यवसायिक होते त्यांच्या विशिष्ट अशा खुणा होत्या. सुतारकीच्या व्यवसायाची खुण म्हणजे वाकस अथवा किंकरे होते.[५४]

सुतार आपल्या लहानशा व्यवसायाबरोबर मोठी कामे करीत असत. त्यामध्ये प्रामुख्याने इमारतीच्या बांधकामाच्या वेळी लागणारे लाकडी काम नाव करण्याचे, रथ तयार करण्याचे इत्यादी कामे सुतार करीत असत. सन १७३१ मध्ये शनिवार वाड्याच्या बांधकामासाठी लागणारे लाकूड तासुन घेण्यासाठी अनेक सुतार लावल्याचा उल्लेख आढळतो.[५५] पेशवे स्वारीवर जात असत. स्वारीवर असताना पावसाळ्याच्या दिवसामध्ये अथवा बारमाही जास्त पाणी असणा-या नद्या ओलांडण्यासाठी त्याना नावाची गरज भासे. या नावा करुन घेण्यासाठी सन १७७३ मध्ये सेकोजी आंग्रे यानी नावा तयार करण्यासाठी सुतार व लोहार पाठवून देण्याविषयी बाजीराव पेशव्याना कळविले होते.[५६] वरील पत्रावरुन सुतार नावा करत असत असे दिसते.

घोड्याचे रथ करण्याची कला ही सुताराकडे होती. सन १७७२ मध्ये घोड्याचे रथ तयार करण्यासाठी पेशव्यांनी नगरहून सुतार व लोहार पाठवून देण्याविषयी बाजीराव पेशव्यांना कळविले होते.[५७] कांही सुतार संपुर्ण वाड्याचे लाकडी काम करण्याचा मक्ता घेत असत. एका पत्रावरुन अशी माहिती मिळते की, दुस-या बाजीराव पेशव्यांनी विश्रामबागचा वाडा

बांधण्यासाठी मणसाराम सुताराशी करार केला होता.[५८]

सुताराच्या मजुरी विषयी उल्लेख सापडतात.एका पत्राच्या उल्लेखावरुन सुताराला दररोज चार आणे मिळत असत.[५९] परंतु आणखीन कांही उल्लेखावरुन सुताराला मिळणारी मजुरी ही १० रुपयापासून १५ रुपयापर्यंत होती. सन १७३३ मध्ये रामेश्वराच्यादेवळाचे ३ खण बांधण्यासाठी सुतार कामास लावले होते. त्यावेळी त्याना १० रुपयापासून १५ रुपयेपर्यंत पगार दिला होता असा उल्लेख आहे.[६०]

शेतक-याकडून पोळयाच्या सणाला सुतारास कोरडा शिधा मिळे बैलाच्या शिंगातील कडबोळी मिळत असत.[६१] तसेच होळीपुढील ५ नैवेद्य पण सुताराला घेण्याचा हक्क होता.[६२]

## कुंभार :

कुंभाराचा व्यवसाय पेशवेकाळात महत्वाचा होता. त्याचे बलुत्यातील स्थान हे दोन नंबरच्या श्रेणीमध्ये होते. त्याला मिळणारे बलुते ६ रु. कांही वेळा ५ रुपये वर्षाला असे.

कुंभाराचा मुख्य व्यवसाय म्हणजे मातीची भांडी बनविणे हा होता. त्याला मातीची भांडी गावक-यांना आणि प्रवाशांना पुरवावी लागत. कुंभार कौले आणि विटाही तयार करीत असत. कुंभार अक्षयतृतीया, नवरात्र, आणि विवाह यासारख्या प्रसंगी मातीची भांडी बनवुन देई. त्याला पोळयाच्या सणाला बैलाच्या प्रतिमा आणि गौरी उत्सवाच्या वेळी मातीच्या

गौरी प्रतिमा बनवून गावक-याना द्याव्या लागत. गणपती उत्सवाच्या वेळी कुंभार, पाटील, कुलकर्णी व इतर वतनदार अधिका-यासाठी गणेशमुर्ती तयार करुन देई. गुळ तयार करण्याच्या प्रसंगी त्यास शेतक-यास चाक पुरवावे लागे.[६४]

कुंभाराला आपल्या व्यवसायासाठी जी माती लागे ती माती ठराविक ठिकाणाहून गावच्या अधिका-याच्या परवानगीने मिळत असे.[६५] कुंभार कामात विटा तयार करण्याचा समावेश होत असे. विटा तयार करुन देण्यासाठी कुंभार मजूरी घेत असत. १७२५ च्या एका पत्रावरुन विटा तयार करुन देण्याचा दर कुंभार हजारी ५ रुपये घेत असत असा उल्लेख आहे.[६६]

पेशवेकालीन महाराष्ट्रात कुंभारकीची वतने मिळविण्यासाठी कुंभारामधून वाद निर्माण होत असत. सन १७११ च्या एका पत्रावरुन उत्रोळीच्या कुंभाराचा विचित्र गडावरील कुंभारकीचे वतन मिळविण्यासाठी वाद निर्माण झाला होता.[६७] कुंभाराला शेतक-याकडून गु-हाळात ५ ऊस व थोडा गुळ मिळे.[६८] कुंभाराची लग्नात वरात ही गाढवावर निघे.[६९]

कुंभाराना आपल्या व्यवसायाप्रित्यर्थ काही प्रमाणात कर द्यावे लागत. कुंभार वतनदार मंडळींना प्रत्येक आव्यास (कच्ची मडकी भाजण्याची भट्टी) ५ मडकी देत असत.[७०] कुंभाराची खुण चाक होती.[७१]

कुंभार समाजात अनेक उपजाती होत्या. त्यामध्ये प्रामुख्याने अहिर, लहान चाके, थोर चाके, पंचम लिंगायत, कोकणी, लाड आणि मराठा कुंभार इत्यादी. घु-हेंच्या मते, लहान चाकावर काम करणारे लहान

चाके आणि थोर चाकावर काम करणारे ते थोर चाके होत.[७२] तत्कालीन कागदपत्रातुन कुंभाराचे पोटभेद होते असे दिसुन येते. त्यामध्ये मराठा कुंभार आणि परदेशी कुंभार यांचा समावेश होत असे. परदेशी कुंभार विटा व कौले तयार करीत असत. तर मराठा कुंभार मडकी तयार करीत असत.[७३]

लग्नप्रसंगी कुंभाराची वधु व वर यांची घोडयावरुन मिरवणूक निघे. परंतु या गोष्टीस कासाराने हरकत घेतली होती की, कुंभाराची वधुवरे घोडयावरुन मिरवु नये. सदरहू वादाचा निकाल लागुन कुंभाराची लग्न मिरवणूक घोडयावरुन मिरवावी असे ठरले.[७४]

डॉ.इरावती कर्वे यांनी कुंभाराच्या जातीविषयी आणि व्यवसाया-विषयी माहिती आपल्या " हिंदु समाज एक अन्वयार्थ " या पुस्तकात दिली आहे. त्यांच्यामते महाराष्ट्रात कुंभाराच्या जातीत अनेक पोटभेद होते. त्यामध्ये मराठी कुंभार, परदेशी कुंभार, गुजराती कुंभार, राणा, अहिर, लाड इत्यादी.[७५]

## लो हा र :

लोहार शेतीच्या उपयोगाचा महत्वाचा बलुतेदार होता. गावक-यांना शेतीसाठी लागणारी सर्व लोखंडी अवजारे दुरुस्त करण्याचे काम लोहाराचे असे. शेती अवजारात प्रामुख्याने कोयते, कुदळी, फावडी आणि दरवाज्यासाठी लागणा-या साखळ्या आणि त्याचबरोबर कुलपे इत्यादी तयार करण्याचे काम लोहाराला करावे लागे. लोहार गाव-क-याच्या आणि प्रवाशाच्या घोड्याला नाल ठोकत असत.[७६]

पेशवेकालात महाराष्ट्रात ग्रामीण भागात मोठया प्रमाणात यात्रा भरत असत. यात्रेच्या वेळी लोक खंडोबाला आणि भैरोबाला नवस करीत असत. ज्याने नवस केला असेल त्याच्या मानेस बगाडाचे गळ खुपसण्याचे काम लोहार करीत असत. परंतु सन १७६४ मध्ये सासवडच्या सुतारामध्ये व लोहारामध्ये गळ कोणी टोचावा याबद्दल वाद निर्माण झाला होता. यावरुन बागाडाचे गळ टोचण्याचे काम लोहार करीत असत असे दिसते.[७७]

शेती अवजारे तयार करण्याबरोबर लोहार पाण्यातील नावाना लागणारे लोखंडी साहित्य पुरवीत असे. घोडयाचे रथ, टाकसाळीतील कामे यासाठी लोहार लागत असत. सन १७३३ मध्ये स सेखोजी आंग्रेनी बाजीरावाला पाठविलेल्या पत्रावरुन बाजीरावाने नावा तयार करण्यासाठी सुतार व लोहार पाठवून दिले होते.[७८] सन १७७२ मध्ये पेशव्यांनी महादजी नारायण यास रथ करण्यासाठी सुतार व लोहार आणण्याविषयी कळविले होते.[७९] पेशवाईन टांकसाळी मधुन लोहार कामे करीत असत.[८०] कांहीवेळा लोहाराला शेतक-याकडून प्रतिवर्षी २½ रुपये बलुते मिळे. मोठाल्या गांवी असणा-या लोहाराशिवाय कांही भागातून घिसाडी लोहारकीची कामे करीत असत. हे लोक हमेशा फिरतीवर असत. ज्या गावात लोहार नसे त्या गावातुन हे लोक फिरत. घिसाडी आपला सर्व व्यवहार रोखीनेच करत असत. पळया, चमचे, नाचकाणे, तवा इत्यादी संसारोपयोगी वस्तु ते तयार करीत असत. त्यांच्या स्त्रिया गावात फिरुन या वस्तु विकत असत.[८२]

लोहार गावाचा उपयुक्त बलुतेदार असल्याने लोहारकीचे वतन ठरावीक अशा व्यक्तींनाच मिळे. हे वतन मिळविण्यासाठी पेशवाईत लोहारांची भांडणे होत असत.[८३]

वरील सर्व माहितीवरून पेशवेकाळात लोखंडाची अवजारे तयार करणारे लोहार आणि त्यांचा लोहारकीचा व्यवसाय हा महत्वाचा होता हे निदर्शनास येते.

प री ट :

परीट हा सुध्दा इतर बलुतेदाराप्रमाणे महत्वाचा बलुतेदार होता. त्याचे काम म्हणजे गावातील लोकांचे कपडे धुणे होय. लग्नप्रसंगी नवरानवरी ज्या रस्त्याने जात, त्या रस्त्यावर परीटाला कापड पसरावे लागे. त्या मोबदल्यात त्याला विवाहाचे चारही दिवस लग्नघरी मेजवाणी मिळे. गुळ तयार करण्याच्या हंगामात उसाचा रस गाळण्यासाठी लागणारे पांढरे कापड त्याला पुरवावे लागे. होळीचे वेळी एरंडाचे झाड आणणे, सरपण रचणे, या मोबदल्यात परीटाला होळीपुढील नैवेद्य व पानसुपारी मिळे.[८४]

न्हा वी :

न्हावी जातीत वाजंत्री व मशालजी अशा पोटजाती होत्या.[८५] न्हाव्याची मुख्य कामे म्हणजे दर पंधरा दिवसांनी गावकऱ्यांची हजामत करणे, दाढी करणे, नखे कापणे, ही होत. दसरा दिवाळी सारख्या उत्सवाच्या दिवशी तो पाटील, कुलकर्णी यांच्या अंगास उटणे, तेल लावून मालीश करी. लग्नाच्या वेळी ज्यावेळी नवरा गावात येई त्यावेळी त्याचा घोडा धरून वधुगृही त्याला न्यावे लागे, त्यावेळी त्यास शेला व पागोटे मिळे. नागपंचमीच्या दिवशी पाटील कुलकर्णी आणि इतर वतनदार

अधिका-यांच्या घरी जाऊन त्यांच्या पत्नीस व इतर महिलास वाळ्काला जाण्यासाठी आमंत्रीत करणे हे न्हाव्याचे काम असे. पाटील, कुलकर्णी ज्या-वेळी दौ-यावर असतील तेंव्हा त्यांच्यासोबत न्हाव्याला जावे लागे. त्यांची तांब्याची भांडी स्वच्छ करुन वाहून न्यावी लागत. सार्वजनिक उत्सवाच्या प्रसंगी न्हावी स्वयंपाक करी आणि भांडी घासी. होळीच्या वेळी न्हावी सर्व गावक-यास विडयाची पाने पुरवी.[८६] नवरात्रात देवीच्या समोर आरसा धरणे, तुळशी विवाहाच्या वेळी पूजेसाठी हुरडा वतनदारांना देणे इत्यादी कामे त्याला करावी लागत. नव-याची जुनी वस्त्रे, पायीचे तांदुळ, होळीचा नैवेद्य इत्यादी साहित्य त्याला मिळे.[८७]

कांही वेळा त्याला शेतकरी प्रतिवर्षी ५ रुपये बलुते देत.[८८] दिवाळीच्या सणाच्या दिवशी न्हावी वतनदाराकडे जाऊन तेल लावून मालीश करीत असत. त्याबद्दल त्यास चोळी, खण, पैसे मिळत; अणजुर येथे न्हाव्याचे घर होते. तो न्हावी नरकचतुर्थीच्या दिवशी गावातील वतनदाराच्या घरी जाऊन तेल आणि उटणे लावुन मालीश करीत असे.[८९]

न्हाव्यामध्ये मेहतरकीच्या वतनाविषयी वाद निर्माण होत. सन १७२३ मध्ये न्हावी महाला वल्लद कसबे आढाव व सेटीयाजी भगर कसबे यांच्यामध्ये म्हेतरपणाचा वाद होता.[९०] न्हावी जातीत न्हाव्याच्या वतनाविषयी वाद निर्माण होत. असाच एक वाद दादाजी कोंडदेवाच्या काळापासून १७७९ पर्यंत चालु होता. एका वतनाचे तीन भाग करुन तीन व्यक्तीना देण्यात आले होते.[९१] चांभार बुरुडाचा जसा वाद होता तसा वाद न्हावी आणि बुरुडाचा होता. मायणी व निमसोड येथील न्हावी बुरुडांचे केसकापत नसत अशी माहिती मिळते.[९१]

सोनार :

सोनार वंशपरंपरागत सोन्या चांदीचे अलंकार व भांडी बनवीत असत. पेशवे काळात कपडयापेक्षाही जास्त महत्व दागिण्यांना दिले जाई. एखाद्या पुरुषाच्या अंगावर दागिना नसणे हे कमीपणाचे मानले जाई. एखाद्या व्यक्तीची ऐपत ही दागिण्यावरुन ओळखली जात असे. पेशवाईत सोनाराच्या व्यवसायात उत्क्रांती होत गेलेली दिसून येते.[९३] पेशवेकाळात सोनारालाच पोतदार ही संज्ञा असून[९४] कांही वेळा सोनाराचा बलुतेदारात तर कांही वेळा अलुतेदारात समावेश झालेला आढळून येतो.

शाहू महाराजानी कोल्हापूरच्या शिवाजीराजाची कन्या आपल्या जवळ ठेवुन घेतली होती. तिची परत पाठवणी करते वेळी तिच्या अंगावर दहा हजार रुपयाचे अलंकार घातले होते. पेशवेकाळात दागीण्यांची व अलंकाराची अधिकच वाढ झालेली होती. कारण त्यांच्या देव्हाऱ्यातील देव आणि देवालयातील देव हे सोन्या-चांदीनी बनविलेले असत. यामुळे सोनाराचा व्यवसाय पेशवेकाळात अधिक भरभराटीस आला होता असे म्हणावे लागेल.[९५] पेशवाईत जमा झालेला महसुलाचा कांही भाग नाण्याच्या स्वरुपात असे. त्यामुळे नाणी पारखण्याचे काम सोनार करीत असल्याने त्याना गावगाडयात मानाचे स्थान होते.[९६]

नानासाहेब पेशवे मोठे शौकीन होते. त्यांनी आपला पुत्र विश्वासराव यांच्या करीता सोन्याचा गोफ तयार करुन पाठविण्याविषयी अंताजी नारायण यास पत्र दिले होते.

" चिरंजीव राजश्री विश्वासराव यांचे कमरेचे मोज घेऊन पाठविले

आहे. त्याप्रमाणे गोफ सोन्याचा तयार करून पाठवीणे म्हणून जासुदा-जवळ पत्र दिले. त्यात लिहिले आहे परंतु मोज पाठविले नव्हते याकरिता हल्ली डाकेबरोबर मोज गोपाचे चिरगुटाची धान पाठविली असे तर घेऊन मोजाप्रमाणे गोफ तयार करून पाठवुन देणे.[९७]

तसेच विश्वासरावाबरोबर त्याच्या धाकट्या भावासाठी नानासाहेबांनी सोन्याची वाळे आणि घाग-या करून घेण्यासाठी आपल्या कारकुनास आज्ञा केली होती त्यावरून त्याचे उत्तर असे.

" पंचपात्रे रुप्याची तीन दिडसे तोळ्याची करविली आहेत ती व चोपदारास काठ्या रुप्याच्या २00 भार रुप्याच्या करविल्या आहेत व राजश्री माधवराव याजकरिता वाळे घाग-या सोन्याच्या व हलक्या जोड दोन हलके करविले आहेत. ते आज्ञेप्रमाणे घडविले आहेत."[९८]

आनंदीबाईने कोपरगावाहून चिमाजी आप्पाकरिता नानाकडे सोन्याच्या साखळ्या मागितल्या होत्या.[९९] विश्वासराव, नारायणराव, माधवराव या तिघांना सोन्याच्या मोत्याची बाळलेणी सारखीच असतीलच परंतु नानासाहेब पेशव्यांच्या मृत्युनंतर आपल्या धाकट्या भावाची हौस पुरविण्याची जोखीम माधवरावाकडे आली असता ती योग्य प्रकारे पार पाडल्याची दिसुन येते. सन १७६७ च्या मार्च मध्ये नारायणरावासाठी एक कंठी तयार केली. त्याने कंठी मिळाल्याचे गंगापुराहून कळविले होते.[१00]

" पेशवाईन नवीन दागीने करण्यासाठी जुने दागीने मोडण्याची उदाहरणे आहेत. इ.स.१७८७ मध्ये लग्नात जुने दागीने मोडुन नवीन दागीने

तयार करण्याचे गोडबोल्यानी नानासाहेबास सुचविले होते.[१०१] थोरले माधवराव वारले त्यावेळी त्यांच्या पत्नी रमाबाई सती गेल्या. सती जातेवेळी बाळकृष्णशास्त्री यांच्या पत्नीस ४५ अष्टपैलु हिरे आणि ९४ हिरकण्या असलेल्या कंगण्या दिल्या होत्या.[१०२] अनेक लहानशा दागीण्या-बरोबर मोठे दागीने पेशवे खरेदी करत असत. दुस-या बाजीरावाने सव्वा लाख रुपयाची एक हि-याची पोहची बापु चिपळुणकर सोनाराकडून करुन घेतली होती. तर दुसरी हि-याची पोहची ११,००० रुपयाची कृपानाथ आरगनाथ देवकाशीकर याजकडून घेतली होती. एक [illegible] नथ पांच हजाराची होती. एका सात पदरी मोत्याच्या कंठीची किंमत ८०००० रुपये होती असे उल्लेख पेशवेकालीन कागदपत्रावून पहावयास मिळतात.[१०३]

सोनाराना त्यांच्या कामाचा मोबदला मिळे. त्याना सोनारकीचे वतन मिळे. आणि हे वतन मिळविण्यासाठी सोनारामधून वाद होत असत. इ.स.१७६४ मध्ये लोणी बुद्रुक येथील सोनाराच्या वतना विषयी वाद होता. माधवरावानी निकाल देऊन लक्ष्मण सोनारास लोणी बुद्रुकचे वतन दिले.[१०४]

नेवासे परगण्याच्या पोतदारी बद्दल तेथील कमावीसदार त्र्यंबकराव लक्ष्मण यास त्या परगण्याच्या सोनारकीचे काम करुन घेण्याबद्दल कळविले होते. या वतनासाठी त्याला चार रुपये परगण्यासाठी व मोठया गावासाठी दोन रुपये व लहान गावासाठी एक रुपया या प्रमाणे मुशाहिरा मिळत असे.[१०५]

सोनाराना मिळणारी वतने नवीन करुन घेण्यासाठी सरकारकडे हे

वतनदार अर्ज करत असत. इ.स.१७७१ च्या उल्लेखावरुन तर्फ केळशी सुभा दाभोळ तालुका सुवर्णदुर्ग येथील पोतदाराचे वतन नूतन करुन देण्याविषयी गणेशशेट वल्लद आणि महादेशेट वल्लद यांनी पेशव्याकडे मागणी केली होती.[१०६] हे वतन मिळविण्यासाठी सोनारात वाद निर्माण होत असत. सन १७८३ मध्ये कृष्णाजी लक्ष्मण फडणीस, नेवासे व लक्ष्मण सोनार पोतदार परगणे मिरी शेवगाव व दिप्या सोनाराचा पोतदारासंबंधी वाद निर्माण झाला होता.[१०७]

इ.स.१७७१ मध्ये सासवडच्या भिकाजी मोरेश्वर सराफास दुकान घालुन देण्याविषयी सासवडच्या कुलकर्णी आणि देशपांडे यास सांगीतले होते.[१०८] दागीने उजळुन देण्याबद्दल सोनारास रोख मोबदला मिळे.[१०९]

पेशवाईत सोन्याच्या वस्तु तयार करण्याबरोबर सोनार पेशव्यांच्या अनेक टांकसाळीमधुन कामे करीत असत. सरकारी टांकसाळी बरोबर खाजगी टांकसाळी घालण्यास पेशवे सरकार परवाने देत असे. या टांकसाळीमधुन काम करण्यासाठी सोनार, घणकरी, शिक्केकरी यांचा भरणा असे.[११०]

इ.स.१७१२ ला सातारचे छत्रपतींनी महादेव शेटी सोनार यास पुरंधर किल्ल्यावर टांकसाळ घालण्याविषयी नारोपंत सचीव यास आज्ञा केली होती. त्याचा हाशील १,००० रुपयास ३१ । रुपये व शंभर मोहरास रु.३४/- येणे प्रमाणे मोईन केला होता.[१११] नाणी पाडत असताना नाण्याची नुकसानी झाल्यास त्याची भरपाई सोनाराना द्यावी लागे.[११२] कांही सोनाराना नाणी पाडण्याबद्दल दरमहा चार रुपये दिल्याचा उल्लेख आहे.[११३]

कांही वेळेस टांकसाळी घालण्यासाठी मक्ता दिला जाई. हा मक्ता सहामाही, तिमाही आणि वार्षिक (वर्षावर) असे. बटीरो रामदातार यास रेवदंड्यास टांकसाळ घालण्याकरिता अशा प्रकारचा मक्ता दिला होता.[११४] तसेच नागोठाणे येथे बाळाजी बापूजी यास टांकसाळ घालण्यासाठी मक्ता दिला होता. इ.स.१७८२ मध्ये खुर्दा पाडण्याच्या टांकसाळीचा परवाना दुल्लभशेट याना कोकण प्रांताकरिता मिळाला होता.[११५]

वरील सर्व माहितीच्या आधारे पेशवेकाळातील सोन्याचे दागीणे घडविणारे, सराफीचा व्यवसाय करणारे आणि टांकसाळी मधुन काम करणारे सोनार व त्यांच्या सोनारकीचे व्यवसाय याचे स्वरुप स्पष्ट होते.

## गु र व :

पेशवेकालीन महाराष्ट्रात खेड्यामधुन धार्मिक सेवा करणारे अनेक वर्ग होते. त्यात प्रामुख्याने गुरव, जोशी, मुलाणा यांचा समावेश होत असे. गावक-याच्या धार्मिक गरजा आणि सामाजिक गरजा हा वर्ग पुरवीत असे. खेड्यामधील व शहरातील सर्व देवळातील देवमुर्तीची षोडषोपचारे पुजा करणे हे गुरवाचे मुख्य कर्तव्य असे. तो गोमय लिंपुन देऊळ स्वच्छ सारवी, शमी पुजनाच्या दिवसी तो सर्व गावक-यात पुजेसाठी आवश्यक गंध, फुले इत्यादी देई. तुलशी विवाहाप्रसंगी पूजेस लागणारी चिंच आणि इतर वस्तू पुरवी, तुळशी विवाहाच्या मुळचिठ्ठयाचे घरोघरी वाटप करणे, लग्नप्रसंगी पत्रावळ्या पुरवणे, इत्यादी कामाच्या मोबदल्यात त्यास शेला आणि चार दिवस मेजवानी मिळे.[११६]

गावामधुन पूजेसाठी लागणारे फुल, पत्री, बेल व लग्नातील मुंडावळ्या गुरव पुरवीत असे.[११७]

डॉ.गवळींच्या मते गुरव हा महादेवाच्या मंदिराचा पुजारी असे. त्यांच्यात अनेक पोट भाग पडलेले होते. त्यामध्ये प्रामुख्याने अहिर आणि जैन गुरव होत. गुरवांच्यात वाजंत्री वाजविणारे कांही लोक होते. गुरव जातीच्या अनेक पोटभागात लोखंडे - लोखंड विकणारे, फुलझरे, सोनटक्के, गायकवाड आणि नाकाडे इत्यादींचा समावेश होत असे.[११८]

पेशवेकालात देवाच्या व्यवस्थापनेसाठी देवस्थान इनाम म्हणुन कांही जमीनी गुरवास इनाम दिल्या होत्या. देवळाची व्यवस्था पाहणा--याकडे या जमिनी असत. इनाम जमिनीच्या उत्पन्नातुन वहिवाटदाराने देवाच्या पुजेअर्चेस येणारा खर्च करावा लागे. सन १७४३ मध्ये उदेरी किल्ल्यावरील कनकेश्वराच्या यात्रेसाठी गुरवास इनाम करुन दिले होते. त्यावेळी यात्रेला येणा-या बाहेरील लोकांची सोय केली जाई.[११९] देवळात देवासमोर जळणा-या दिव्यासाठी त्याच्या खर्चासाठी कांही गावामधून जमिनी इनाम दिलेल्या होत्या. बदलापूर येथील त्र्यंबकेश्वराच्या देवळाचे पुजारी गुरव होते.आणि त्यांना १८१० साली देवाच्या नैवेद्यासाठी आणि नंदादिपासाठी २बिघे जमिन इनाम दिलेली होती. [१२०] चेऊल येथील विसाजी भांडविलकर गुरव यांनी देवाच्या नैवेद्यासाठी आणि नंदादीपासाठी चेऊलवाडीचा महसुल मिळावा म्हणुन मानाजी आंग्रेकडे तक्रार केली होती.[१२१]

भारतीय संस्कृति कोषामध्ये गुरवास शिवाच्या मंदिराचे पुजारी म्हटले आहे. गुरवाच्या जातीत बरेच भाग पडलेले दिसुन येतात. त्यामध्ये

मराठी गुरव, लिंगायत गुरव यांचा समावेश होत असे. लिंगायत गुरव हे जाणवे घालत असत. गुरवाच्या स्त्रिया लिंगाची पुजा करीत असत.[१२२]

गुरव देवाचे पुजारी असल्याने कांही लोकांना देवाचा अंगारा लावून आजारातुन बरे करीत असत. बाळाजी बाजीरावाच्या पहिल्या पत्निचा इसब पर्वतीवरील गुरवाने अंगारा लावल्याने बरा झाला होता अशी माहिती मिळते.[१२३]

धार्मिक कार्यासाठी अनेक वेळा गुरवाचा उपयोग होई. १७३६ मध्ये शाहूचा मुक्काम फलटणला पडल्यामुळे छत्रपतीच्या कामासाठी ५ गुरव आणले होते.[१२४]

वरील सर्व माहितीवरून गुरवाचे पेशवेकालीन समाजातील स्थान दिसून येते.

ग्रामजोशी :

१८ व्या शतकात धार्मिक जीवनात ब्राम्हणांना महत्वाचे स्थान होते. गावातील सामाजिक व धार्मिक कामे ग्राम जोशाला करावी लागत असत. खेडयातील जोशी म्हणजे पंचाग पाहून लावणी, संचनी, आणि लग्न-कार्यासाठी मुहुर्त काढुन देणारा ब्राम्हण होय.[१२५] हे ग्रामजोशी सर्व गावातून आढळत नसत. या ग्रामजोशाबरोबर गावामध्ये कांही ब्राम्हण मंडळी उपाध्येपण करत असत. सन १७४३ मध्ये सासवड येथील पिलाजी जाधवांचे उपाध्येपण मिळविण्यासाठी सासवडच्या खंडोशिवदेव आणि रामाजी

रंगनाथ पाणसी यांचा वाद निर्माण झाला होता.[१२६]

पेशवाईत महाराष्ट्राची सत्ता ब्राम्हणाच्या हाती गेल्याने ब्राम्हणांना महत्व प्राप्त झाले होते. १८ व्या शतकात छपाईची कला अवगत नसल्याने सर्व शास्त्रे मुखोद्गत करुन बहुजन समाजाला सांगण्याचे काम ब्राम्हण करीत असत. सर्वधर्म बांधवाचे, कुळधर्म, कुलाचार देवदेवतांची प्राणप्रतिष्ठा, सोळा संस्कार, इत्यादी अनेक कामे ब्राम्हणांना पार पाडावी लागत असत.[१२७]

ग्रामजोशाचे काम म्हणजे गुडी पाडव्याला चावडीत अगर देवळात पंचाग सांगणे होय.[१२८] पंचाग कोणापुढे अगोदर सांगावे याविषयी तंटा निर्माण होत असे. चेऊलच्या जोशी आणि उपाध्यानी पंचाग प्रथम देसाई, देशमुख, देशपांडे आणि प्रमुख जमिनदार व ग्रामस्थ यांच्याकडे सांगावे व नंतर सरकारी अधिका-याकडे सांगावे असा निकाल पहावयास मिळतो.[१२९]

पेशवेकाळात लोकांचा जोतिषावर मोठा विश्वास होता. सन १७५२ मध्ये पांडुरंग जोशी यानी पेशव्यांना प्रवासाला निघण्यासाठी चांगला मुहुर्त सांगितला होता. १७७७ ला हरीपंत फडक्यानी चांगली वेळ पाहून स्वारीस कुच केले होते. १७७५ ला नारायणरावाच्या खुनानंतर त्यांच्या पत्निस मुलगा होईल असे भविष्य पुण्यातील नारायण महादेव पावसकर यांनी सांगितल्यामुळे त्याला जमिन इनाम मिळाली होती.[१३०]

ग्रामजोशाना शेतक-याची अनेक धार्मिक कामे करावी लागत असत. पोळ्याच्या सणाला बैलाची पूजा व पंचाग सांगणे, गणपती आणि लक्ष्मीपूजा,

तुळशिची लग्ने, इत्यादी धार्मिक विधीच्यावेळी गावकरी जोशाला घरी बोलावून घेत असत. श्रावणात सत्यनारायणाची पूजा त्यालाच करावी लागे. त्याबद्दल त्यास दक्षिणा व शिधा मिळे.[१३१]

नवरात्रामध्ये देवीची पूजा करण्याचे काम जोशाला करावे लागे. घरोघरी घट देणे, सिमोल्लंघणाच्या दिवशी आपटा पूजा जोशाला करावी लागे. या कामाच्या मोबदल्यात त्यास घटातील सुपारी व पैसा, लग्नाच्या वेळचे पुजेचे साहित्य, नवरानवरीची जुनी वस्त्री इत्यादी वस्तु जोशाला मिळत असत.[१३२]

वरील सर्व गोष्टींवरुन जोशी हा ग्रामीण जीवनातील महत्वाचा बलुतेदार होता हे दिसते. कांहीवेळा त्याला शेतक-याकडून अडीच रुपये वर्षाला मिळत असत.[१३३]

ग्रामजोशाना अभिषेक घालावा लागे.[१३४] कांही ठिकाणी धार्मिक सेवेचा मोबदला म्हणुन वतन दिले जाई. या वतनासाठी जोशी आणि उपाध्ये यांची भांडणे लागत असत. इ.स.१७०५ दरम्यान संगमेश्वराच्या धार्मिक कार्यासाठी कासी उपाध्ये आणि कोलवलीकर यांच्यात वाद निर्माण झाला होता.[१३५] इ.स.१७२२ च्या एका वादावरुन जोशी वतन मिळविण्यासाठी जोश्यामध्ये भांडणे होत असत असे दिसते. कारवे, सेरे, वडिगाव या तीन गावच्या जोशाचा वाद अशाचप्रकारे होता.[१३६]

कांही गावामधून उपाध्ये आणि जोशी हे वेगळे असत. जोशानी गावासंबंधी पूजा, होळीची पूजा, विजयादशमीची पूजा इत्यादी कृत्ये

करावीत आणि उपाध्यानी पुण्यहावन, प्रायश्चित, निबंधपूजा इत्यादि धार्मिक कृत्ये करावीत अशी प्रथा होती.[१३७]

पेशवाईत कुठल्याही शुभ आणि अशुभ कार्यासाठी ज्योतिष्याचा सल्ला घेत असत. नाना फडणीसाच्या १७७२ च्या एका पत्रात खालील प्रमाणे उल्लेख सापडतात.

" सेवेसी बाळाजी जनार्दन कृ.सा.न.वि., शके पंचान्नवमध्ये गुरुचा रासीभेद होत नाही त्यास या वर्षाचे नाव काय ? त्या वर्षी शुभ कार्यादी कर्तव्या-कर्तव्य विचार पंडित व जोतिषी मेलवुन निर्णय करुन वाक्यसहित सविस्तर लिहून पाठविणे म्हणुन आज्ञा."[१३८]

इ.स.१७९७ मध्ये दुस-या बाजीरावाच्या वेळी तालुके कित्तूरकडच्या रामजी महादेव सहस्त्रबुध्दे यानी पाऊस पडण्याविषयीचे भविष्य वर्तविले होते त्याप्रमाणे पाऊस पडला म्हणुन त्याला २०० रुपये सालीना तैनात करुन दिली होती.[१३९]

मु ला णा :

मुलाण्याचे मुख्य काम म्हणजे गावातील मशिदी आणि पिर यांची व्यवस्था ठेवणे होय. मुलाणा हा मुसलमान पुजारी असून तो हिंदुच्या बलुता पध्दतीमध्ये सामावून गेलेला होता. मराठी माणसे त्याना खाटीक म्हणत असत.[१४०]

मुलाणा हा बलुतेदार असल्याने एखादे बकरे घेऊन त्याचे मांस विकत असे. त्यावेळी त्याला साधारणपणे चार ते पांच रुपये फायदा मिळे.[१४१]

पेशवेकालात महाराष्ट्रातील अनेक खेडयामधून मुलाणा हाच मुसलमानाचे सर्व धार्मिक कार्ये पार पाडीत असे. परंतु कांही गावातून मुलाणा, काझी, फकीर, हे वेगवेगळे असल्याचे दिसून येते. बकरी मारण्याचे काम जास्त करुन खाटकाचेच असे. इ.स.१७०८ मध्ये गदाधर प्रल्हाद प्रतिनीधी यांनी अंताजी त्रिमल यास मुदपाकखान्यात बकरी मारण्यासाठी सेटी खाटकास ७५ रुपये देण्यास सांगितले होते. कारण हा खाटीक छत्रपती शाहू महाराजास मटण पुरवित होता.[१४२]

मुलाणाचे गावाच्या धार्मिक सेवेसाठी वंशपरंपरागत वतन देण्यात येत असे. इ.स.१७३६ मध्ये मौजे मुदरुळ येथील मशिदीचा मुलाणी मृत्यु पावला. म्हणून दुसरा मुलाणी नेमण्यात आला होता. परंतु मयताच्या मुलीस मुलगा असल्याचे व मुसलमाणी कायद्यानुसार मशिदीचे मुलाणपण त्याच्याकडे येत असल्याने मुलाणा म्हणून त्याचीच नेमणुक करावी असे कृष्णाजी विठ्ठल यांनी मौजे मुदरुळ परगणे कराड येथील मुकादमास कळविले होते.[१४३]

वरील सर्व माहितीच्या आधारे बलुतेदारी पध्दती विषयी माहिती मिळते. या पध्दतीच्या उगमाविषयी आणि स्वरुपा विषयी ब-याच विद्वानांनी विचार केलेला आहे. बेडन पॉवेल यांच्या मते ही पध्दत आर्यांनी द्रविडाकडून उचलली पण डॉ.ए.एस्.आळतेकर यांचेमते आर्यांनीच भारतात आल्यानंतर या पध्दतीची सुरुवात केली.[१४४]

कार्लमार्क्स या पद्दतीविषयी असे म्हणतो की, " This dozen of individuals is maintained at the expense of the whole Community " बेडन पॉवेलने " The Indian Village Community " या ग्रंथात त्यानक कारागीर व चाकर यांना ठरावीक वस्तुरुपाने मेहनताना देऊन किंवा सारामुक्त जमीन देऊन सेवा करुन घेण्याची पद्दत फार जूनी आहे असे म्हटंले आहे. मॅक्स वेबर या समाजशास्त्रज्ञाने "General Economic History "(1924) या ग्रंथात या पद्दतीला "Demiurgic Mode of Employment ( डेमीअर्जिक नेमणूक पद्दती) असे म्हटंले आहे. कारागीर व सेवक यांना कामाकरीता वैयक्तीकरित्या उत्पन्न मिळत नाही. त्यांना त्यांच्या सेवेबद्दल जमीनीचा कांही भाग किंवा उत्पादनाचा कांही वाटा मिळतो. हे ग्रामसेवक म्हणजे " भूदास " (Serfs) होत. यालाच मॅक्स व्हेबर "Demiurgic labour " असे म्हणतो. सेन या पद्दतीविषयी सांगताना मराठेकालीन खेडी स्वयंपूर्ण होण्याचा प्रयत्न करीत असत व यामुळेच बलुतेदारी पद्दती निर्माण झाली असे म्हणतात. या जून्या सिद्दांताऐवजी डब्ल्यू.एच्. वायझरसारख्या विद्वानांनी या पद्दतीविषयी नवीन सिद्दांत मांडण्याचे प्रयत्न केले. वायझरने उत्तर भारतातील खेडे गावांचा अभ्यास करुन "The Hindu Jajmani System " हा ग्रंथ लिहीला. जजमाणी पद्दती व हक्क हे शब्द गावक-यातील परस्पर संबंध दर्शविणारे आहेत. या पद्दतीत गावचा कारागीर किंवा ग्रामसेवक ठराविक कुटुंबाची सेवाचाकरी करतो व या बदल्यात त्याला वर्षाखेरी कांही मोबदला मिळतो. ग्रामसेवक ज्या कुटुंबाची सेवा करतो त्याला " यजमाण " म्हटले जाई. "यजमाण" त्याच्याकडे काम करणा-या सेवकांना " कामवाले " "कामकरणेवाले" असे म्हणत असत. डॉ.फुकाजावा यांच्या मते बलुतेदारी पद्दती ही मॅक्स व्हेबरने वर्णन केल्याप्रमाणे "Demiurgic" स्वरुपाची होती. वायझरने वर्णीलेली

जजमाणी पध्दत बारा बलुतेदाराना लागु करता येणार नाही. फारतर ती पुरोहित वर्गाला लागु करता येईल. पण डॉ.अ.रा.कुलकर्णी यांच्या मते या दोन्ही पध्दतीचा संगम महाराष्ट्रात आढळतो. खेडे आकाराने लहान असेल तर ग्रामसेवकाला सर्व गावक-यांची सेवा करता येई. पण गांव जर मोठे असेल तर प्रत्येक कारागीराला त्याची गि-हाईके बांधुन दिली जात.[१४५]

-x-x-x-x-x-

संदर्भ :


१. कुलकर्णी अ.रा., शिवकालीन महाराष्ट्र, पृ.९, ११.

२. कित्ता, पृ.१३.

३. कित्ता, पृ.४०.

४. राजवाडे वि.का., म.इ.सा., खं.१५, पृ.२७३-८०.

५. ओतुरकर रा.वि., पेशवेकालीन सामाजिक आर्थिक पत्रव्यवहार, पृ.५५.

६. भावे वा.कृ., पेशवेकालीन महाराष्ट्र, पृ.३४२.

७. डॉ.कर्णिक शशिकांत, पेशवेकालीन महाराष्ट्र सामाजिक व आर्थिक जीवन, भा.ई.आणि सं., वर्ष -२४, पृ.९३-९४., पृ.५४.

८. ओतुरकर रा.वि., पे.सा.आ.प., पृ.५५.

९. डॉ.गवळी पी.ए., ~~पृ.९०.~~, पेशवेकालीन जातीय संघर्ष, पृ.९०

१०. वाड ग.चि., पेशवा रोजनिशी, खं.८, पृ.२८६.

११. अत्रे टी.एन्., गावगाडा, पृ.३.

१२. भावे वा.कृ., पेशवेकालीन महाराष्ट्र, पृ.३४६.

१३. डॉ.शशिकांत कर्णिक, पेशवेकालीन महाराष्ट्र,सामाजिक व आर्थिक जीवन, भा.इ.आणि सं., वर्ष-२४, पृ.९३-९४,एप्रिल,जुन,जुले,१९८७. पृ.५२,५३,५४.

१४. ओतुरकर रा.वि., पे.सा.आ.प., पृ.३२.

१५. कित्ता, पृ.५५.

१६. कित्ता, पृ.५७

१७. जोशी श.ना., मराठेकालीन समाजदर्शन, पृ.३२.

१८. भा.इ.सं.मं., पु.५४ , पृ.२, अं.१९.

१९. वाड ग.चि., पे.रो., खं.८, पृ.२८६.

२०. ओतुरकर रा.वि., पे.सा.आ.प., पृ.५५.

२१. डॉ.कर्णिक शशिकांत, पेशवेकालीन महाराष्ट्र, सामाजिक व आर्थिक जीवन, भा.इ.आणि सं.,वर्ष-२४, पु.९३-९४, पृ.५१-५२.

२२. पवार ए.जी., ताराबाई कालीन कागदपत्रे, खं.१, ले.२३०.

२३. ओतुरकर रा.वि.,पे.सा.आ.प., पृ.४४.

२४. सरदेसाई गो.स., पे.द., खं.४३, पृ.५४-५५.

२५. गव्ळी पी.ए., पेशवेकालीन जातीय संघर्ष, पृ.९.

२६. वाड ग.चि., पे.रो.,खं.८, पृ.१३३.

२७. ओतुरकर रा.वि., पे.सा.आ.प., पृ.५५.


BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

२८· जोशी श·ना·, मराठेकालीन समाजदर्शन, पृ·१७·

२९· कित्ता, पृ·२५·

३०· राजवाडे वि·का·, म·इ·सा·,खं·२०, पृ·२२५-२६·

३१· जोशी श·ना·, मराठेकालीन समाजदर्शन, पृ·३२·

३२· राजवाडे वि·का·, म·इ·सा·, खं·२१, पृ·२६४-६५·

३३· अत्रे टी·एन्·, गावगाडा, पृ·८५·

३४· शिवचरित्र साहित्य, खं·३, पृ·६६·

३५· चापेकर ना·गो·, पेशवाईच्या सावलीत, पृ·१०१·

३६· ओतुरकर रा·वि·, पे·सा·आ·प·, पृ·५५·

३७· जोशी श·ना·, मराठेकालीन समाजदर्शन, पृ·२५-२६·

३८· भावे वा·कृ·, पेशवेकालीन महाराष्ट्र, पृ·३४३·

३९· राजवाडे वि·का·, म·इ·सा·,खं·२०, पृ·१२·

४०· कित्ता, पृ·२३३·

४१· चापेकर ना·गो·, पेशवाईच्या सावलीत, पृ·४७·

४२· सरदेसाई गो·स·, पे·द·, खं·२२, पृ·३०४·

४३· पवार ए·जी·, ता·का·का·, खं·१, पृ·३३५-३९·

४४· जोशी श·ना·, मराठेकालीन समाजदर्शन, पृ·२२·

४५· ओतुरकर रा·वि·, पे·सा·आ·प·, पृ·५०·

४६· Crawford, History of Poona and Deccan, in it Perspective, P.2/3

४७. डॉ.कर्णिक, पे.म;सा.व आ.जी., भा.इ.आणि सं.,व-२४, पु.९३-९४, पृ.९१.

४८. सरदेसाई , पे.द.,खं.४३, पृ.८२.

४९. ओतुरकर, पे.सा.आ.प., पृ.५५.

५०. पवार ए.जी., ता.का.का., खं.१, पृ.१३५-३९.

५१. जोशी श.ना.,मराठेकालीन समाजदर्शन, पृ.२६.

५२. Enthoven, Tribes and Casts of Bombay, P.355

५३. आपटे, ओतुरकर, महाराष्ट्राचा पत्ररुप इतिहास, पृ.२०३.

५४. शिवचरित्र साहित्य, खंड ३, पृ.४०-४१.

५५. सरदेसाई गो.स., पे.द., खं.९, पृ.३,४.

५६. कित्ता, खं.३३, पृ.१४.

५७. वाड ग.चि., पे.रो., खं.९, पृ.६९.

५८. सरदेसाई गो.स., पे.द.,खं.२२, पृ.१५४.

५९. चापेकर ना.गो., पेशवाईच्या सावलीत, पृ.८.

६०. कित्ता, पृ.२५०.

६१. जोशी श.ना., मराठेकालीन समाजदर्शन, पृ.१७.

६२. कित्ता, पृ.२२.

६३. ओतुरकर रा.वि., पे.सा.आ.प., पृ.५५.

६४. डॉ.कर्णिक, पेशवेकालीन महाराष्ट्र सामाजिक व आर्थिक जीवन, भा.इ.आणि सं., वर्ष २४, पु.९३-९४, पृ.५१.

६५. राजवाडे वि.का., म.इ.सा.,खं.१५, पृ.१५९.

६६. कित्ता, खं.३, पृ.८६.

६७. शिवचरित्र साहित्य, खं.३, पृ.१८९.

६८. जोशी श.ना., मराठेकालीन समाजदर्शन, पृ.२४.

६९. कित्ता, पृ.३२.

७०. राजवाडे वि.का., म.इ.सा.,खं.२०, पृ.२२५-२६.

७१. शिवचरित्र साहित्य, खं.३, पृ.४०,४१.

७२. Ghurye G.S., Cast and Race in India, P.31-41.

७३. वाड ग.चि., पे.रो., खं.६, ले.७७५.

७४. कित्ता, खं.७, पृ.२६५.

७५. डॉ.इरावती कर्वे, हिंदु समाज एक अन्वयार्थ, पृ.११९.

७६. डॉ.शशिकांत कर्णिक, पेशवेकालीन महाराष्ट्र सामाजिक आणि आर्थिक जीवन, भा.इ.आणि सं., वर्ष-२४, पृ.९३-९४, पृ.४९.

७७. ओतुरकर रा.वि., पे.सा.आ.प., पृ.५४.

७८. राजवाडे वि.का., म.इ.सा.,खं.२१, पृ.४९-५०.

७९. वाड ग.चि., पे.रो., खं.९, पृ.६९.

८०. कित्ता, खं.७, पृ.२९८.

८१. ओतुरकर रा.वि., पे.सा.आ.प., पृ.५५.

८२. कामत वि.स., मराठ्यांच्या व्यापारी उलाढाली, भा.इ.आणि सं., वर्ष-२०, पु.७९, पृ.२४.

८३· ओतुरकर रा·वि·, पे·सा·आ·प·, पृ·५४·

८४· डॉ·कर्णिक, पेशवेकालीन महाराष्ट्र, सामाजिक व आर्थिक जीवन, भा·इ·आणि संस्कृती, वर्ष-२४, पु·९३-९४, पृ·४९-५०·

८५· डॉ·गवळी पी·ए·, पेशवेकालीन जातीय संघर्ष, पृ·७·

८६· डॉ·कर्णिक, पेशवेकालीन महाराष्ट्र, सामाजिक व आर्थिक जीवन, भा·इ·आणि संस्कृती, वर्ष-२४, पु·९३-९४, पृ·५०-५१·

८७· जोशी श·ना·, मराठेकालीन समाजदर्शन, पृ·१९,२७·

८८· ओतुरकर रा·वि·, पे·सा·आ·प·, पृ·५५·

८९· नाईक गजानन गोविंद, अणजुरकर नाईक घराण्याचा साद्यंत इतिहास, पृ·२०-२१·

९०· कर्वे चि·ग·, न्हावी म्हेतरपणाचा वाद, भा·इ·स·म·,ले·ग्रंथमाला-६६, पुणेनगर संशोधन वृत्त, खं·३, पृ·२४७·

९१· वाड ग·चि·, पे·रो·, खं·१, ले·२९१·

९२· राजवाडे वि·का·, म·इ·सा·खं·२४, पत्र ६४·

९३· भावे वा·कृ·, पेशवेकालीन महाराष्ट्र, पृ·१४८·

९४· ओतुरकर रा·वि·, पेशवेकालीन सामाजिक व आर्थिक पत्रव्यवहार,पृ·५५·

९५· भावे वा·कृ·, पेशवेकालीन महाराष्ट्र, पृ·१४९·

९६· जोशी श·ना·, मराठेकालीन समाजदर्शन, पृ·३५·

९७· भावे वा·कृ·, पेशवेकालीन महाराष्ट्र, पृ·१४९·

९८· कित्ता,

९९· भावे वा·कृ·, पेशवेकालीन महाराष्ट्र, पृ·१४९·

१००· सरदेसाई गो·स·, पे·द·, खं·३२, पृ·४३, ले·७६·

१०१· कित्ता·

१०२· भावे वा·कृ·, पेशवेकालीन महाराष्ट्र, पृ·१५२·

१०३· सरदेसाई गो·स·, पे·द·, खं·२२, पृ·१५२·

१०४· वाड ग·चि·, पे·रो·,खं·७, पृ·१५१·

१०५· कित्ता, पृ·१०७·

१०६· कित्ता, पृ·१११·

१०७· चापेकर ना·गो·, पेशवाईच्या सावलीत, पृ·११६-१७·

१०८· ओतुरकर रा·वि·, पे·सा·आ·प·, पृ·७७·

१०९· सरदेसाई गो·स·, पे·द·, खं·४, ले·२०· पृ·२३·

११०· चापेकर ना·गो·, पेशवाईच्या सावलीत, पृ·३०·

१११· पवार ए·जी·, ता·का·का·, खं·१, पृ·२५९·

११२· परंदरे कृ·वा·, परंदरे दप्तर, भाग-१, पृ·४०·

११३· कित्ता, पृ·१४१·

११४· केळकर न·ची·, मराठे व इंग्रज, पृ·२४१·

११५· कित्ता, पृ·२४३·

११६· डॉ·कर्णिक , पेशवेकालीन सामाजिक व आर्थिक जीवन,भा·इ·आणि सं·, वर्ष-२४, पु·९३-९४, पृ·५२·

११७. ओतुरकर रा.वि., पे.सा.आ.प., पृ.४३.

११८. डॉ.गवळी पी.ए., पेशवेकालीन जातीय संघर्ष, पृ.७-८.

११९. भा.इ.स.मं., वर्ष-२८, अं.३-४, पृ.४९-५०.

१२०. चापेकर ना.गो., बदलापूर (आमचागांव), पृ.२२३.

१२१. भा.इ.स.म., वर्ष-२८, अंक-३,४, पृ.५८.

१२२. भारतीय संस्कृती कोष, खं.३ पृ.७०

१२३. जोशी ना.वि., पुणेवर्णन (साहित्यसंघ सहकार) पृ.२६.

१२४. सरदेसाई गो.स., पे.द., खं.८, पृ.८-९.

१२५. कुलकर्णी अ.रा., शिवकालीन महाराष्ट्र, पृ.१८.

१२६. ओतुरकर रा.वि., पे.सा.आ.प., पृ.३६.

१२७. भावे वा.कृ., पेशवेकालीन महाराष्ट्र, पृ.२९४.

१२८. जोशी श.ना., मराठेकालीन समाजदर्शन, पृ.१६.

१२९. भा.इ.स.म.,वर्ष-८, अंक ३-४, पृ.२१.

१३०. Gokhale B.G., Poona in the 18th Century An Urban History, P.185.

१३१. जोशी श.ना., मराठेकालीन समाजदर्शन, पृ.१७-३१.

१३२. कित्ता.

१३३. ओतुरकर रा.वि., पे.सा.आ.प., पृ.५५.

१३४. कित्ता. पृ.१५३.

१३५· राजवाडे वि·का·, म·इ·सा·,खंड-२१, पृ·१६-१७·

१३६· कित्ता, पृ·१४७, ले·११०·

१३७· जोशी ग्रामोध्याय भांडण, भा·इ·स·म·,वर्ष-२९, पृ·३५·

१३८· सरदेसाई गो·स·, पे·द·, खं·४३, ले·८०, पृ·७०·

१३९· वाड ग·चि·, पे·रो·, खं·५, पृ·२०१, ले·१९६·

१४०· डॉ·गवळी पी·ए·, पेशवेकालीन जातीय संघर्ष, पृ·२·

१४१· सरदेसाई गो·स·, पे·द·, खं·७, पृ·५·

१४२· कित्ता,

१४३· पवार ए·जी·, ता·का·का·, खं·२, पृ·१९८, ले·१५७·

१४४· Altekar A.S., History of Village Communities in Western India, PP. 90-91.

१४५· Dr.Hirose Fukazawa, Rural Servents in the 18th Century Maharashtrian Village - Demiurgic or Jejmani System ? in Hitotsubashi, Journal of Ecomomics, Vol.12,No.2.PP.14-20. डॉ·कुलकर्णी अ·रा·, शिवकालीन महाराष्ट्र, पृ·४१-४३·

=0=0=0=0=0=